श्रीमती एम. डब्ल्यू. जाधव, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाली यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाली येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एम. डब्ल्यू. जाधव, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाली ह्या अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाली या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती एम. डब्ल्यू. जाधव, ह्या अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार श्रीमती एम. सी. हसगे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, रोहा यांजकडे राहील.

**श्रीमती एस. एस. सावंत,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक ७ नोव्हेंबर २०२२.

## पोलीस उप आयुक्त कार्यालय, विशेष शाखा, ठाणे शहर यांजकडून

### आदेश

क्रमांक वि.शा./एम.आय.डी.सी./मनाई आदेश/३१७१/२०२२.— ज्याअर्थी, उल्हासनगर महानगरपालिका विरुद्ध वनशक्ती चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सर्वोच्च न्यायालयात दाखल सिव्हील अपिल क्र. १०५८२/२०१७ सुनावणीमध्ये आदेशित केल्याप्रमाणे मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११ नोव्हेंबर २०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २३ नोव्हेंबर २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

२. ज्याअर्थी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी सर्वोच्च न्यायालयास सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील मुद्दा क्र. ३ मधील उपमुद्दा क्र. ८ मध्ये नमूद प्रमाणे सर्व औद्योगिक क्षेत्रामध्ये संध्याकाळी १८-०० ते सकाळी ०६-०० वाजेपावेतो सर्व प्रकारचे टॅंकर वाहतुकीला त्वरित बंदी घालण्याचे आश्वासित केले आहे.

३. ज्याअर्थी, सर्व संबंधीत औद्योगिक क्षेत्रामध्ये संध्याकाळी १८-०० ते सकाळी ६-०० या कालावधीत टॅंकरमधून धोकादायक केमिकल वाहून नेऊन ते रात्रीच्या वेळी नदीच्या पात्रात सोडले जातात, त्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होते. पाणी प्रदूषित झाल्याने लोकांचे आरोग्यास धोका निर्माण होतो आणि नदीतील जैवविविधतेवर परिणाम होतो. त्या अनुषंगाने तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ अन्वये खालील तरतुदीच्या अनुषंगाने डोंबिवली, अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ व बदलापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये सर्व प्रकारचे टॅंकर बंदीबाबत आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

४. त्याअर्थी, मी, डॉ. सुधाकर पठारे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर आम्हास पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी त्यांना, शासनाच्या दिनांक १ एप्रिल १९७४ चे अधिसूचनेद्वारे ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून प्रदान करण्यात आलेले अधिकार त्यांनी, त्यांचे कार्यालयीन आदेश जावक क्रमांक CP/SB/ORDERS/87/2022, DATE 07/04/2022 अन्वये प्रदान केल्याने त्या अधिकारांचा वापर करून डोंबिवली, अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ व बदलापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये संध्याकाळी १८-०० ते सकाळी ६-०० वाजेपावेतो सर्व प्रकारचे टॅंकर वाहतुकीला बंदी घालण्यात येत आहे.

सदर मनाई आदेश दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजी ००-०१ पासून दिनांक १३ जानेवारी २०२३ रोजी २४-०० वा पर्यंत अंमलात राहील.

डोंबिवली, अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ व बदलापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये संध्याकाळी १८-०० ते सकाळी ६-०० वा. पर्यंत सर्व प्रकारचे टॅंकर वाहतुकीला बंदी राहील.

५. सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

६. संबंधितांना स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पो.उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

७. सदरचा आदेश हा माझ्या सही-शिक्क्यानिशी आज दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ रोजी दिलेला आहे.

**डॉ. सुधाकर पठारे**,
पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा, ठाणे शहर.

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांजकडून

### मनाई आदेश

क्रमांक वि.शा/टे-१३/मनाई आदेश/२०२२-८३२३.— ज्याअर्थी, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्याकडून जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा, अतिक्रमण हटवणे तसेच दिनांक १७ नोव्हेंबर २०२२ रोजी बाळासाहेब ठाकरे पुण्यतिथी या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते ;

ज्याअर्थी, मी, प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालयाकडील क्रमांक पो.आ.वा./अधि. प्रदान/आदेश/३०/२०२०, दिनांक ९ नोव्हेंबर २०२० अन्वये, मा. पोलीस आयुक्त यांचे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३७ चे पोट-कलम (१) व (३) चे वापरावयाचे अधिकार आम्हास प्रदान करण्यात आले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मिरारोड, काशिमिरा, नवघर, नयानगर, भाईंदर, उत्तन, वसई, माणिकपूर, आचोळे, वालीव, पेल्हार, नालासोपारा, तुळींज, विरार, अर्नाळा व मांडवी असे एकूण १६ पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे व्हावे.

त्याअर्थी, वरील घटनांच्या अनुषंगाने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मी, प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार, महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ चे पोट-कलम (१) व (३) अन्वये जीवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था जोपासण्यासाठी खालीलप्रमाणे मनाई आदेश देत आहे :—

१. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, लाठ्या किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तू बाळगणे.

२. दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जमा करणे.

३. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

४. व्यक्तींच्या किंवा प्रेताकृतीच्या प्रतिमेचे प्रदर्शन करणे.

५. सार्वजनिक रितीने घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजवणे.

६. सभ्यता अगर निती या विरुद्ध असतील अशी किंवा राज्यातील शांतता धोक्यात आणतील किंवा ज्यामुळे राज्य शासन उलथून पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक प्रदर्शित करणे.

७. पाच किंवा पाचपेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इत्यादी कृत्यांना या आदेशान्वये मनाई करीत आहे.

**वरील मनाई आदेश खालील व्यक्तींना लागू राहणार नाही.**

“ जो कोणी इसम सरकारी नोकर आहे किंवा ज्यास वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्र घेणे भाग पडेल किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने सूट दिलेली आहे. ”

**सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागू राहणार नाहीत.**

१. लग्न कार्यासाठी जमलेले लोक.

२. प्रेतयात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका.

३. सरकारी / निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेरी येथे जमलेले लोक.

४. सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला समुदाय.

५. पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या सभा / मिरवणुका.

६. सर्व शासकीय / निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडत असलेली ठिकाणे.

सदर मनाई आदेश दिनांक १७ नोव्हेंबर २०२२ रोजीचे ००-०१ वाजेपासून ते दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजीचे २४-०० वाजेपर्यंत अंमलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**प्रकाश गायकवाड,**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईंदर, वसई-विरार.

दिनांक १४ नोव्हेंबर २०२२.

## जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांजकडून

**वाचा.—** (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. आस्थापना-१०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८/०८/१९९४.

(२) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस. व्ही.सी. आर. ४३२०/स. ४/९४, दिनांक २२/०९/१९९४.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- २०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२/०२/२०१९

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण/ड्रोन सर्व्हे / प्र.क्र.३९/२०२१, दिनांक २५/०१/२०२१.

(५) उप अधीक्षक, भूमि अभिलेख भिवंडी यांचेकडील पत्र क्र./न. भूमा./भिवंडी/गावठाण ड्रोन/गौजे गोंदाडे/परिरक्षण प्रस्ताव/२०२२/४१८३, दिनांक २२/०९/२०२२.

### अधिसूचना

क्रमांक शि.दा./गावठाण/अधिसूचना/मौजे गोंदाडे/२०२२/२९९२.— महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. आस्थापना-१०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८/०८/१९९४ अन्वये भूमि अभिलेख विभगाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर./४३२३/स-४/९४, दिनांक २२ सप्टेंबर १९९४ अन्वये कोकण विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र. क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ अन्वये राज्यात जमाबंदी प्रकल्प राबविण्यात मान्यता दिली आहे त्यानुसार गावठाण झालेल्या गावांचे परिरक्षण साठी घेण्याचे अधिसूचना मंजुरीचे अधिकार मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण/ड्रोन सर्व्हे/प्र.क्र.३९/२०२१, दिनांक २५ जानेवारी २०२१ अन्वये जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना देण्यात आलेले आहेत.

उप अधीक्षक, भूमि अभिलेख भिवंडी यांनी त्यांचेकडील दिनांक २२ सप्टेंबर २०२२ चे प्रस्तावामध्ये त्यांचे अधिनस्त सजा पडघामध्ये मौजे गोंदाडे गाव नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

त्यानुसार शर्तीस अधीन राहून स्वामित्व योजना अंतर्गत ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेल्या मौजे गोंदाडे, ता. भिवंडी, जि. ठाणे या गावाचे गावठाण भूमापनाचे काम पूर्ण झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, भिवंडी यांचे अधिनस्त सजा पडघामध्ये मौजे गोंदाडे हे गाव नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्व्दारे मंजुरी देणेत येत आहे.

सदर गावची सनद फी रक्कम रु. २५७८५ ची त्वरित वसुली करण्यात यावी. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ७ नोव्हेंबर २०२२ पासून होणेची आहे.

## परिशिष्ट ‘ ब ’

नगर भूमापन योजनेंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या गावांचा/मिळकतींचा तपशील

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कार्यालयाचे नाव | सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध (पुनर्रचने पूर्वी) | | | परिरक्षणास नव्याने घ्यावयाचे गाव | | पुनर्रचनेनंतर ची स्थिती | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सजा | गावे | मिळकती | गाव | मिळकती | सजा | गावे | मिळकती | |
| 1 | ठाणे | भिवंडी | उ.अ.भू.अ भिवंडी | पडघा | पडघा | ११९० | गोंदाडे | २३ | पडघा | पडघा | ११९० | |
| | | | | | बोरीवली | १०१९ | | | | बोरीवली | १०१९ | |
| | | | | | टेमघर | १४३७ | | | | टेमघर | १४३७ | |
| | | | | | भादवड | १०३ | | | | भादवड | १०३ | |
| | | | | | राहनाळ | २२० | | | | राहनाळ | २२० | |
| | | | | | खोणी | ७९ | | | | खोणी | ७९ | |
| | | | | | काटई | ८६ | | | | काटई | ८६ | |
| | | | | | वळ | १४३ | | | | वळ | १४३ | |
| | | | | | कवणे | २५५ | | | | कवणे | २५५ | |
| | | | | | दिवे | १९७ | | | | दिवे | १९७ | |
| | | | | | कारिवली | १७६ | | | | कारिवली | १७६ | |
| | | | | | कालवार | २१३ | | | | कालवार | २१३ | |
| | | | | | ------ | ------ | | | | गोंदाडे | २३ | |
| | | | | एकूण | | ५०३८ | | | एकूण | | ५०६१ | |

**बाबासाहेब रेडेकर,**
जिल्हा अधीक्षक,
भूमि अभिलेख, ठाणे.

**पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांजकडून**

**आदेश**

(फौजदारी प्रक्रिया दंड संहित, १९७३ च्या कलम १४४ अंतर्गत)

क्रमांक पोआ/११(०६)/ड्रोन/१४४/(२)/२०२२.— ज्याअर्थी, दहशतवादी/राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडरचा वापर करून त्यांच्या हल्ल्यांमध्ये आणि त्याद्वारे व्हीव्हीआयपींना लक्ष करू शकतात. मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणू शकतात, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करू शकतात आणि बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था बिघडवू शकतात.

२. त्याअर्थी, अशा ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड, मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडरद्वारे संभाव्य घातपात रोखण्यासाठी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयात अशा घटकांच्या कारवाया, ज्यासाठी काही प्रतिबंधात्मक आणि सक्रिय उपाययोजना करणे आवश्यक आहे.

३. म्हणून मी, संजय लाटकर, पोलीस उप आयुक्त (अभियान) बृहन्मुंबई आणि कार्यकारी दंडाधिकारी मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा कायदा II) च्या कलम १४४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांद्वारे, ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर्स, पॅरा मोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स हॉट एअर बलून इत्यादीच्या उड्डाण क्रियांना बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात प्रतिबंध करण्याचे आदेश पुढील ३० दिवसांसाठी म्हणजे १३ नोव्हेंबर २०२२ ते १२ डिसेंबर २०२२ पर्यंत देत आहे. मुंबई पोलिसांकडून हवाई पाळत ठेवणे किंवा पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई यांच्या लेखी विशिष्ट परवानगीने करण्यात येणारी कारवाई अपवाद राहील.

४. हा आदेश दिनांक १३ नोव्हेंबर २०२२ रोजी रात्रौ ००-०१ पासून दिनांक १२ डिसेंबर २०२२ रोजी २४-०० वाजेपर्यंत त्यापूर्वी मागे घेतल्याशिवाय लागू राहील.

५. दिनांक ७ नोव्हेंबर २०२२ रोजीचा या संदर्भातला जुना आदेश रद्द करण्यात येत आहे.

६. या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम १८८ अन्वये दंडनीय असेल.

७. सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या नोटीस बजावली जाऊ शकत नसल्यामुळे, याद्वारे एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे. लोकांच्या माहितीसाठी प्रसार माध्यमाद्वारे आणि सर्व पोलीस ठाणे, सर्व स.पो.आ., सर्व पो.उ.आ., महानगरपालिका वॉर्ड ऑफिस, तहसील ऑफिसच्या नोटीस बोर्डवर प्रती चिकटवून प्रकाशित केले जाईल.

सदरचा आदेश माझ्या सही-शिक्क्यानिशी आज दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ रोजी दिला आहे.

**संजय लाटकर,**
पोलीस उप आयुक्त (अभियान)
तथा कार्यकारी दंडाधिकारी,
बृहन्मुंबई.

## OFFICE OF THE COMMISSIONER OF POLICE, GREATER MUMBAI

### Order

No. CP/XI (6)/144/(11)/2022.— WHEREAS, it is likely the terrorist anti-national elements might make use of drones, remote controlled micro-light aircrafts, para-gliders in their attacks and thereby target VVIPS, endangering the life of public at large, destroy public property and cause disturbance to law and order in the Brihanmumbai Police Commissionerate area.

2. WHEREAS it has become necessary that certain restrictions should be put on the activities of such elements across the Brihanmumbai Police Commissionerate to prevent probable sabotages through such drones, remote controlled micro-light aircrafts, para-gliders, for which some preventive and proactive measures needed be taken to prevent the same :

3. THEREFORE, I, Sanjay Latkar, Dy. Commissioner of Police (Operations), Brihanmumbai and Executive Magistrate, *vide* powers conferred upon me under section 144 of the Criminal Procedure Code, 1973 (Act II of 1974 ), do hereby order that no flying activities of drone, remote controlled micro-light aircrafts, para-gliders, Para Motors, Hand gliders, Hot air balloons, etc. shall be allowed in the jurisdiction of Brihanmumbai Police Commissionerate for the period of next 30 Days, i.e. from 13th November 2022 to 12th December 2022 except for aerial surveillance by Mumbai Police or by specific permission in writing by Dy. Commissioner of Police (Operations). Brihanmumbai.

4. This order shall remain in force with effect 00-01 hrs. of 13th November 2022 till 24-00 hrs. of 12th December 2022 unless withdrawn earlier.

5. Old order *vide* dated 7th November 2022 in this regard is Cancelled.

6. Any person contravening this order shall be punishable under Section 188 of the Indian Penal Code, 1860.

7. As the notice cannot be served individually to all concerned, the order is hereby passed *ex-parte*. It shall be published for the information of public, through press and by affixing copies on the Notice Boards of the police stations, Divisional ACsP, Zonal DCsP, Municipal Ward offices, and by affixing copies at Tahsil and Ward offices.

Given under my hand and seal on the 11th day of the November, 2022.

SANJAY LATKAR,
Dy. Commissioner of Police (Operations)
and Executive Magistrate,
Greater Mumbai.

## पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा ठाणे शहर यांजकडून

### आदेश

क्रमांक वि.शा./सुरक्षा शाखा/मनाई आदेश/०७/२०२२.— देशातील विविध ठिकाणी अतिरेकी/दहशतवादी असामाजिक घटक यांनी रिमोटद्वारे नियंत्रीत होणाऱ्या ड्रोन अथवा हवाई क्षेपणास्त्राद्वारे हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत. प्राप्त परिस्थितीमध्ये ठाणे शहर पोलीस आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असलेल्या भागात अतिरेकी/दहशतवादी असामाजिक घटक हे पॅरा-ग्लाइडर्स, रिमोटव्दारे कंट्रोल होणाऱ्या ड्रोन अथवा मायक्रो लाईट एअरक्राफ्टचा वापर करून हल्ला करू शकतात.

२. ज्याअर्थी, ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मानवी जीवनाच्या सुरक्षिततेला व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होण्याचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो ;

३. ज्याअर्थी, ड्रोनद्वारे, हवाई क्षेपणास्त्राद्वारे, पॅराग्लायडरद्वारे किंवा रिमोट नियंत्रित मानव विरहीत विमानाद्वारे हल्ला रोखण्यासाठी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दहशतवादी / असामाजिक घटकांच्या कारवायांवर आळा घालणे आवश्यक आहे. तसेच ठाणे शहरात हे प्रकार रोखण्यासाठी तातडीने कारवाई करणे आवश्यक असल्याबाबत माझी खात्री झाली आहे.

४. त्याअर्थी, मी, डॉ. श्रीकांत परोपकारी, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर, आम्हांस पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी त्यांना शासनाच्या दिनांक १ एप्रिल १९७४ चे अधिसूचनेद्वारे ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून प्रदान करण्यात आलेले अधिकार त्यांनी, त्यांचे कार्यालयीन आदेश जावक क्रमांक CP/SB/ ORDERS/87/2022, DATE 07/04/2022 अन्वये प्रदान केल्याने त्या अधिकाराचा वापर करून पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत रिमोटद्वारे कंट्रोल होणारे ड्रोन, नियंत्रीत हवाई क्षेपणास्त्र, पॅराग्लायडर्स किंवा मायक्रो लाईट एअर क्राफ्ट यांच्या उड्डाण क्रियाकलापांना सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगी शिवाय ठाणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दिनांक २० नोव्हेंबर २०२२ पासून ते दिनांक १८ जानेवारी २०२३ रोजी मध्यरात्री पर्यंत ६० दिवसांच्या कालावधीमध्ये बंदी करीत आहे. परंतु रिमोट कंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्ट ड्रोनद्वारे हवाई निगराणी करण्यास ठाणे शहर पोलिसांना परवानगी राहिल.

५. सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

६. संबंधितांना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पो.उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

७. सदरचा आदेश हा माझ्या सही-शिक्क्यानिशी आज दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी दिलेला आहे.

**डॉ. श्रीकांत परोपकारी,**
पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा, ठाणे शहर.

## उपविभागीय अधिकारी, राजापूर यांजकडून

### अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३. कलम ४(१)**

क्रमांक एलएक्यु/एसआर/१४४.— ज्या अर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १६ मार्च, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी मौजे-विवली, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथील धरणस्थळ बुडीत क्षेत्र, सांडवा कामासाठी भूसंपादन होत असून यात यासोबत जोडलेल्या अनसूचिमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन संपादन करण्याचा, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचा उद्देश आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनमध्ये देण्यात आलेल्या सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करण्यासंबंधीतील तरतुदी विचारात घेता, समुचित शासनाने सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्याचा समुचित शासनाचा हेतू असल्यास ते बाधित क्षेत्रामधील ग्राम स्तरावर किंवा वॉर्डस्तरावरील संबंधित पंचायत, नगरपालिका किंवा यथास्थिती, महानगरपालिका यांच्याशी विचारविनिमय करून अशा शासनाकडून अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रितीने आणि अशा दिनांकापासून सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अंमलात आणेल अशी तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम १ मध्ये करण्यात आली आहे ;

त्या अर्थी, आता उपरोक्त कायद्याचे कलम ३ चे पोट-कलम (ई) प्रमाणे जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना समुचित शासन म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे आणि कलम ३ चे पोट-कलम (ग) नुसार जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी त्यांचे वतीने पुढील कार्यवाही करण्यासाठी उप-विभागीय अधिकारी, राजापूर यांना प्राधिकृत केले आहे. सबब याद्वारे उपविभागीय अधिकारी, राजापूर असे अधिसूचित करीत आहे की, बाधित क्षेत्रामध्ये भाकर सेवा संस्था, मु. पो. कोंड्ये, ता. लांजा, जि. रत्नागिरी, यांच्याकडून भूमी संपादन पुनर्वसन आणि पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४, मध्ये विहित केलेल्या रितीने दिनांक १३ डिसेंबर २०२२ पासून सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्यात येईल.

### अनुसूची

**भूसंपादन संस्थेचे नाव :—** जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण, विभाग कुवारबांव, रत्नागिरी.

**प्रयोजन :—** विवली, ल. पा. योजना, ता. लांजा, जि. रत्नागिरी धरणस्थळ, बुडीत क्षेत्र, सांडवा कामासाठी भूसंपादन.

**गावाचे नाव :—** मौजे- विवली, ता. लांजा, जि. रत्नागिरी.

**एकूण क्षेत्र :—** ३८.८१.५५ (हे आर).

| अनु-क्रमांक | सर्वे नंबर/ गट नंबर | संपादन करावयाच्या क्षेत्राचा चतुःसीमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | संपादन क्षेत्राच्या पूर्व सीमेस सर्व्हे नं./हि.नं. | संपादन क्षेत्राच्या पश्चिम सीमेस सर्व्हे नं./हि.नं. | संपादन क्षेत्राच्या उत्तर सीमेस सर्व्हे नं./हि.नं. | संपादन क्षेत्राच्या दक्षिण सीमेस सर्व्हे नं./हि.नं. |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | २४८ पै | २८०अ | २७८अ | २१९ | २९९ |
| २ | २७८/१ पै | २४८ | २७७ | २४४ | २७८ ब |
| ३ | २७७ पै | २७८ | २४६ | २४६ | २७८ |
| ४ | २४६ पै | २४४ | - | २४४ | २७७ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ५ | २४४ पै | २४४ | २४६ | २४७ | २७८अ |
| ६ | २४७ पै | नाला | २४४ | २१८ | २४४ |
| ७ | २१८ पै | १९२ | १९२ | १९२ | २४७ |
| ८ | १९२ पै | नाला | - | १९३ | २१८ |
| ९ | १४८ पै | नाला | १४८ ब | १९४ | १९२ |
| १० | १९४ पै | नाला | १४८ ब | १८७,१४९ | १४८ ब |
| ११ | १८७ | नाला | १४९ | नाला | १९४ |
| १२ | १४९ पै | १८७ | १४८ अ | १३१ | १९४ |
| १३ | १३१ पै | नाला | १३० | ९२अ | १४८अ |
| १४ | ९२ पै | नाला | - | ४६ब | १३१,१३० |
| १५ | ४६/१ पै | नाला | - | नाला | ४६ ब |
| १६ | ४६/२ पै | नाला | - | नाला | ४६ ब |
| १७ | ४७ पै | ४८ | - | ४८ | नाला, ९३ |
| १८ | ९३ पै | ११०,११२ | नाला | ४७, ८९, ९० | नाला, ११३ |
| १९ | ११३ पै | ११४,१२७ | नाला | ९३ | १३२,१२७ |
| २० | १२७ पै | ११४ | १३२ | ११३ | १३३ |
| २१ | १३२ | १२७ | नाला | ११३ | १३३ |
| २२ | १३३ पै | १३४ | नाला, १५० | १२७, ११४ | १५१ |
| २३ | १५१ पै | १३६, १९६ | नाला, १५० | १३३, १३४ | १९५ |
| २४ | १५० | १५१ | नाला | १३३ | १५१ |
| २५ | १९६ | नाला | १५१ | नाला, १५१ | नाला |
| २६ | १९५ | नाला | नाला | १५१ | नाला |
| २७ | २१९ पै | २२०, २२३ | नाला | नाला | २४८ |
| २८ | २२३ पै | २५० | २१९ | २२० | २७९अ, २९७ब |
| २९ | २२० पै | २२२, २२३ | २१९, २२० | २०४ | २२३ |
| ३० | २०४ पै | २२१, २२२ | २०३, नाला | १५५ | २१९,२२० |
| ३१ | २०३ | २०४ | नाला | २०४ | २०४ |
| ३२ | १५५ | २२१ | नाला | १९८ब, १९८क | २०४ |
| ३३ | १९८/२ | १२१ | १९७ | १५७, १२१ | १९८ |
| ३४ | १९७ | १९८/१ | नाला | १५७ | १९८/२ |
| ३५ | १५७ | १२१ | नाला | १५४ | १९७, १९८अ |
| ३६ | १९८/१ पै | १९८ | नाला | १९७ | १५५ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | १९९ | १२१ | १२१ | १२१ | १२१ |
| ३८ | १२१ पै | १९९ | १९८अ, १५७ | १५४ | - |
| ३९ | १५४ पै | १२१ | नाला | १३९ | १५७, १२१ |
| ४० | १३९ | १५४ | नाला | १३८ | १५४ |
| ४१ | ११७/२ | १२१ | ८६ | ११८, ८६ | ८६, १२१ |
| ४२ | ११७/१ | १२१ | ८६ | ११८ | ८६, १२१ |
| ४३ | ११८ | ११९ | ८६ | ८६ | ११७, १२१ |
| ४४ | ११९ | १२१ | ११८ | ८६ | १२१ |
| ४५ | १११ | ९७ | ८६ | ९७ | ८६ |
| ४६ | ९७ पै | - | १११, ८६ | १९ | १२२ |
| ४७ | ८६/१ पै | ११७, ११८ | ८५, ९९ | ८६ | १३६ ब |
| ४८ | ११६ | १३७, ८६ | ९१, १३६ | ९१, ८६ | १३४, १३५ |
| ४९ | ९१/१ पै | ११६ | ११४, ११५ | ९१अ, ८६ | १३४, १३५ |
| ५० | १३७ | १३६ ब | १३६ ब | ११६, ८६ | १३६ ब |
| ५१ | १३६ पै | नाला | १३४ | १३६ ब | १५१ |
| ५२ | १९ अ पै | ९७ | ८६ | - | ८६, ९७ |
| ५३ | २९९ पै | २४८ | नाला | २४८ | - |
| ५४ | १२२ पै | - | १२१ | ९७ | १२१ |
| ५५ | १३८ पै | १२१ | नाला | १२१ | १३९ |
| ५६ | ११४ | ९१, ११५ | ११३, १२७ | ११२, ११० | १३३ |
| ५७ | ८६/३ पै | ११७, ११८ | ८५, ९९ | ८६ | १३६ ब |

**वैशाली माने,**
उपविभागीय अधिकारी,
राजापूर.

राजापूर,
दिनांक १३ डिसेंबर २०२२.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.